|| श्री गजानन प्रसन्न ||

|| खरेदीखत ||

(SALE DEED)

खरेदीखत आज वार दिनांक माहे डिसेंबर सन २०२४ इसवी ते दिवशी

कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशन
तर्फे संस्थेचे अध्यक्ष
(पॅन नं. - AAQPJ5612F)
प्राचार्य डॉ. सुधाकर उद्धवराव जाधववर
वय - ६४ वर्षे, धंदा : व्यवसाय,
पॅन नं. -
आधार नं. -
राहणार - ....
.... **--- लिहून घेणार**

(ज्यांचा उल्लेख यापुढे या खरेदीखतामध्ये लिहून घेणार असा करण्यात आला असून त्यात त्यांचे वालीवारस, नॉमिनीज, असायनिज ट्रस्टीज, ॲडमिनीस्ट्रेटर्स इ.अंतर्भूत आहेत.)
--- लिहून घेणार

यांसी ...

१) श्री. अतुल श्रीनिवास खरे
वय - ५६ वर्षे, धंदा - शेती व व्यवसाय,
पॅन नं. - ACDPK5130E
आधार नं. - ६९५४ २३७२ ८४५८
२) श्री. यशोधन श्रीनिवास खरे
वय - ५५ वर्षे, धंदा - शेती व व्यवसाय,
पॅन नं. - ACDPK5129R
आधार नं. - ९९३३ ८७०९ ९८६८
दोघेही राहणार - अभ्युदय अपार्टमेंट,
भांडारकर रोड, पुणे - ४११००४ **--- लिहून देणार**

(ज्यांचा उल्लेख यापुढे या खरेदीखतामध्ये लिहून देणार असा करण्यात आला असून त्यात त्यांचे वालीवारस, नॉमिनीज, असायनिज ट्रस्टीज, ॲडमिनीस्ट्रेटर्स इ. अंतर्भूत आहेत.)
--- लिहून देणार

Scanned with OKEN Scanner

खरेदीखत किंमत रक्कम रु. १,२२,०४,०००/-
(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)

कारणे खरेदीखत लिहून देण्यात येते ते येणेप्रमाणे,

१) मिळकतीचे वर्णन :- (DESCRIPTION OF PROPERTY)

तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली यांचे कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने सामाविष्ट झालेले गाव मौजे न-हे येथील जमिन मिळकत यासी सर्व्हे नं. ४६, हिस्सा नं. २९ यांसी क्षेत्र ०० हे. ७० आर + पोटखराबा क्षेत्र ०० हे. ०४ आर असे एकुण क्षेत्र ०० हे. ७४ आर पैकी सदर खरेदीखताचा विषय असलेले क्षेत्र ०० हे ६.७८ आर यांसी खाजगी प्लॉट नं. पी, क्यु, वेल ही जमिन मिळकत यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस	:	नाला
दक्षिणेस	:	स.नं. ४४ पैकी मिळकत
पश्चिमेस	:	खाजगी रेखाकंनातील प्लॉट व अंतर्गत रस्ता
उत्तरेस	:	रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक जमिन मिळकत, त्यातील दगड, विट, माती, झाड झाडोरा, पाला पाचोळा, जल, तारू, तण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप इत्यादी सर्व तदंगभूत वस्तूंसहित, सर्व हक्कांसह तसेच लिहन देणार यांना सदर मिळकतीचे इजमेंटचे, जाण्यायेण्याचे रस्त्याचे, वहीवाटीसाठी, वापराचे, वागणुकीचे व ईजमेंटचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत. येथून पुढे या ६.७८ आर क्षेत्राच्या मिळकतीस सोईकरीता 'सदर मिळकत' असे संबोधिले आहे.

२. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली गाव न-हे येथील सर्व्हे नं. ४६, हिस्सा नं. २९ ही संपुर्ण जमिन मिळकत सौ.विमल श्रीनिवास खरे यांचे खरेदी मालकीची होती व ती त्यांनी सौ.मालती पुरूषोत्तम सुलाखे यांचेकडून खरेदीखताने खरेदी घेतलेली होती. त्याबाबतचे खरेदीखत हे मा. दुय्यम निबंधक साहेब हवेली क्र. १ यांचे कार्यालयात दि. ०३/१०/१९७८ रोजी दस्त क्र. २४१९/१९७८ अन्वये रीतसर नोंदविलेले आहे. त्यानुसार त्यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ उता-या सदरी फेरफार क्र. १३१८ अन्वये रितसर दाखल झालेली होती.

३. तदनंतर वर कलम १ मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत सौ.विमल श्रीनिवास खरे यांनी

Scanned with OKEN Scanner

त्यांची दोन मुले म्हणजेच सदरील लिहून देणार श्री.अतुल श्रीनिवास खरे व श्री.यशोधन श्रीनिवास खरे यांना बक्षीसपत्राने बक्षीस दिलेली असून त्याबाबतचे बक्षीसपत्र हे मा. दुय्यम निबंधक साहेब हवेली क्र. २ यांचे कार्यालयात दि. ०१/०४/२००९ रोजी दस्त क्र. २०१६/२००९ अन्वये रीतसर नोंदविलेले आहे. त्यानुसार लिहून देणार यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ उता-या सदरी फेरफार क्र. ६४९४ अन्वये रितसर दाखल झालेली आहे.

४. अशा प्रकारे वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची असल्याने सदर मिळकतीचा मन मानेल, त्याप्रमाणे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने निरंतर वहिवाट करुन उपभोग घेण्याचा, तिची मर्जीनुरुप विल्हेवाट लावण्याचा वा विकण्याचा लिहून देणार यांना संपुर्ण हक्क व अधिकार होता व आहे.

५. **सदर दस्त मिळकत विकण्याचे कारण -**

लिहून देणार यांनी त्यांची वरील संपुर्ण जमिन मिळकत विक्रीस काढली असता त्याची माहिती लिहून घेणार यांना समजली. लिहून घेणार यांना देखील सदर परिसरामध्ये जमिन मिळकत विकत घेण्याची इच्छा होती. सबब लिहून देणार यांचे वरील संपुर्ण जमिन मिळकतीपैकी वर कलम १ यात वर्णन केल्याप्रमाणे १५ आर जमिन मिळकत म्हणजेच सदर मिळकत लिहून घेणार यांनी लिहून देणार यांच्याकडे विकत मागितली. सदर मिळकतीच्या प्रस्तुत व्यवहाराबाबत लिहून घेणार व लिहून देणार यांनी आपापसात सविस्तर चर्चा करुन सदर दस्त मिळकतीची एकूण उक्ती किंमत **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** एवढी ठरली. लिहून घेणार यांनी सदर मिळकतीच्या मोबदल्यापोटी देऊ केलेली सदर किंमत प्रचलित बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी असून इतरांनी देऊ केलेल्या किंमतीपेक्षा जादा व वरचढ असल्याची खत: खात्री करुन लिहून देणार यांनी सदर दस्त मिळकत व त्यातील त्यांचे सर्व हक्क, अधिकार व हितसंबंध **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** या उक्त्या किंमतीस लिहून घेणार यांना कायम व खुष खरेदी देण्याचे ठरविले. सबब लिहून देणार हे लिहून घेणार यांच्याकडून सदर मिळकतीचे ठरलेल्या किंमतीचा भरणा लिहून घेणार यांचेकडून पुर्णपणे स्विकारुन हे कायम व खुष खरेदीखत लिहून घेणार यांना लिहून देणार लिहून देतात ते खालीलप्रमाणे :

१. **मोबदला -**

लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सदर मिळकतीची एकूण उक्ती किंमत रक्कम **रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** एवढी ठरलेली असून सदर किंमतीस लिहून देणार यांनी सदर मिळकत व त्यातील त्यांना प्राप्त असलेले सर्व प्रकारचे हक्क, अधिकार, हितसंबंध, ताबा वगैरेंसह लिहून घेणार यांना कायमखुष खरेदी दिलेली आहे.त्याचप्रमाणे लिहून घेणार यांनी सदर मिळकत **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)**या मोबदल्यास लिहून देणार यांचेकडून ताब्यासह कायमखुष खरेदी केलेली आहे. सदर मिळकतींच्या मोबदल्याची वर नमुद केलेली किंमत लिहून देणार यांना मान्य व कबुल असून खरेदी किंमतीबाबत लिहून देणार व लिहून घेणार यांची कोणतीही तक्रार नाही.सदर मिळकतींच्या मोबदल्याची रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिलेली असून सदर मिळकत व त्या संदर्भातील सर्व हक्क, अधिकार, हितसंबंध ताबा वगैरे काहीही राखून न ठेवता लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायमस्वरुपी हस्तांतरीत केलेली आहे.

२. **भरण्याचा तपशिल (SCHEDULE OF PAYMENT)**

मोबदल्याची संपुर्ण **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** लिहून देणार यांना खालील प्रमाणे प्राप्त झाली आहे.

रक्कम रु. ६१,०२,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकसष्ठ हजार दोन लाख फक्त) लिहुन घेणार यांनी लिहून देणार क्र. १ श्री. अतुल श्रीनिवास खरे यांना दि. ..../..../२०२२ रोजीच्या .... बॅंक लि. बॅंकेच्या ....शाखेतून डी.डी. नं. ----------- --------------- अन्वये दिले ते लिहून देणार क्र. १ यांना मिळाले.

रक्कम रु. ६१,०२,०००/- (अक्षरी रक्कम रु. एकसष्ठ हजार दोन लाख फक्त) लिहुन घेणार यांनी लिहून देणार क्र. २ श्री. यशोधन श्रीनिवास खरे यांना दि. ..../..../२०२२ रोजीच्या .... बॅंक लि. बॅंकेच्या ....शाखेतून डी.डी. नं. ----------- --------------- अन्वये दिले ते लिहून देणार क्र. २ यांना मिळाले.

रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)

सदर एकुण मोबदला किंमत **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** असा संपूर्ण भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

३. सदर दस्त मिळकतीच्या ताब्याबाबत -

वर कलम २ मध्ये नमुद केलेल्या भरणा तपशिलाप्रमाणे लिहून घेणार यांनी सदर मिळकतीच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम लिहून देणार यांना चेक/डी.डी. स्वरुपात दिलेली आहे. सबब लिहून देणार यांनी एकत्रितपणे प्रत्यक्ष जागेवर जाऊन वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या सदर मिळकतीच्या हद्दी व खुणा दर्शवून तसेच त्यासाठी खुणांचे दगड लावून शांततामय, खुला व प्रत्यक्ष ताबा आज रोजी साक्षीदारांसमक्ष लिहून घेणार यांना दिलेला आहे. सदर मिळकतीचा शांततामय, खुला व प्रत्यक्ष ताबा लिहून घेणार यांनी साक्षीदारांसमक्ष आजरोजी स्विकारलेला आहे. लिहून देणार यांनी सदर मिळकत मालकी हक्काने लिहून घेणार यांच्या प्रत्यक्ष ताबेवहिवाटीत दिलेली असून, त्याबाबत लिहून देणार यांची काहीही तक्रार वा हरकत नाही. हिच ताबेपावती समजण्यात यावी, वेगळया ताबे पावतीची गरज नाही. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली सदर दस्त मिळकत ही प्रस्तुत खरेदीखताने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना ताब्यासह कायमखुष खरेदी दिलेली असून लिहून घेणार हे सदर मिळकतीचे पुर्णपणे मालक व वहिवाटदार झालेले आहेत. सदर मिळकतीचे खरेदीदार मालक म्हणून सदर मिळकतीचा पुत्र - पौत्रादी, वंशपरंपरागत निरंतरपणे मालकी हक्काने वहिवाट करुन उपभोग घेण्याचा अथवा मर्जीप्रमाणे व्यवस्था करुन विक्री अथवा विल्हेवाट लावण्याचा हक्क व अधिकार लिहून घेणार यांना प्राप्त झालेला आहे. सदर मिळकतीबाबत लिहून देणार यांचे वालीवारस व लिहून देणार यांचेमार्फत हक्क व हितसंबंध असल्याचे सांगुन लिहून घेणार यांना सदर मिळकतीचे मालकी हक्क वा ताबेवहिवाटीस कोणी हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण करण्याची खर्चासह सर्वस्वी जबाबदारी व बंधन लिहून देणार यांचेवर आहे व राहील आणि तशी हमी लिहून देणार यांनी प्रस्तुत दस्तातच लिहून घेणार यांना दिली आहे. त्याची कसलीही तोषीस लिहून घेणार यांना लागु देण्याची नाही. ही या खरेदीखताची महत्वाची अट आहे.

४. सदर दस्त मिळकतीच्या पणनयोग्य हक्कांबाबत -

लिहून देणार असे मान्य, कबुल व घोषित करुन लिहून घेणार यांना भरवसा देतात की,

(ए) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असून, ती लिहुन देणार यांनी कोणत्याही जडजोखमीत गुंतवीलेली नाही. सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, लिन, पोटगी, कोर्टदरबार, अन्नवस्त्र, ताबा, वहिवाट वा अशा स्वरुपांचा विषय नाही.सदरचे मिळकतीवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी सावकाराचा कर्जाचा बोजा निर्माण केलेला नाही. तसेच सदरची मिळकत विकत देण्याबाबत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचेशिवाय इतर कोणाबरोबरही कसल्याही प्रकारचा लेखी वा तोंडी

Scanned with OKEN Scanner

करारमदार केलेला नाही. सदरची मिळकत ॲक्वायर, रिक्वायर अगर रिझर्व्हेशनमध्ये गेलेली नाही वा तशा प्रकारच्या नोटीसा आज पावेतो लिहुन देणार यांना आलेल्या नाहीत. सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वा कचेरीत कसल्याही प्रकारचावाद तंटा, भांडण चालू नाही. अशी ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा पूर्ण भरवसा लिहून देणार हे लिहुन घेणार यांना या दस्ताने देत आहेत.लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना अशी हमी दिलेली आहे की, सदर वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये लिहून देणार यांचे व्यतिरिक्त कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही. परंतु, सदर मिळकतीचे लिहून देणार यांचे मालकी हक्क विक्रीयोग्य व तसेच निर्वेध व बोजारहित असल्याबाबतची खात्री लिहून घेणार यांनी त्यांच्या वकिलांमार्फत सदर मिळकतीचे सर्व कागदोपत्री व रेकॉर्ड तपासून नोंदणी कार्यालयामध्ये सदर मिळकतीचा शोध घेऊन व सदर मिळकतीबाबत दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात दि. .../..../...... रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करुन केलेली आहे.

(बी) लिहून देणार स्वतः वा त्यांचेसाठी व त्यांचेवतीने इतर कोणीही सदर दस्त मिळकतीसह, कोणासही कोणत्याही कामासाठी जामीन राहिलेले नव्हते व नाही.

(सी) सदर दस्त मिळकत कोणत्याही कारणासाठी शासनाने ॲक्वीझिशन, रिक्वीझीशन अथवा रिझार्वेशन केलेली नाही. लिहून देणार यांना वा त्यांचेतर्फे कोणासही त्याबाबतची कोणतीही नोटीस आजपावेतो आलेली नव्हती व नाही.

(डी) लिहून देणार यांना सदर मिळकतीबाबत मालकी हक्क होते व आहेत. सदर मिळकतीची वहिवाट करुन उपभोग करुन वा मर्जीनुसार तिची विक्री करण्याचा, विल्हेवाट लावण्याचा लिहून देणार यांना पुर्ण हक्क होता व आहे.

(ई) लिहून देणार हे लिहून घेणार यांना भरवसा देतात की, सदर मिळकत ही कधीही कोणत्याही न्यायालयात कसल्याही वादाचा विषय नव्हती व नाही. सदर दस्त मिळकतीची विक्री करण्यास तसेच सदर दस्त मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्क व अधिकार निर्माण करण्यास कोणत्याही न्यायालयाने कसल्याही प्रकारच्या मनाई / स्थगिती/जैसे थे च्या हुकुमादवारे लिहून देणार यांचेविरुदध कधीही मनाई/स्थगिती, वगैरे दिलेली नव्हती व नाही.

(एफ)सदर मिळकत लिहून देणार यांनी यापूर्वी अन्य कोणास खरेदी, गहाण, दान, हवाला, लीज, लिन, खंड, करार, साठे करार, बक्षिस, विसारपावती, विकसन करणेकामी दिलेली नाही.

Scanned with OKEN Scanner

(जी)मिळकत हस्तांतरण कायद्याप्रमाणे (ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट) लिहून घेणार यांना प्राप्त होणारे सर्व हक्क वा अधिकार अबाधित ठेऊनच हे खरेदीखत लिहून दिलेले आहे. यातील सर्व अटी व शर्ती लिहून देणार यांचेवर व त्यांचे वालीवारसांवर बंधनकारक राहतील.

(एच)सदर मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटस तसेच ७ /१२ उतारा, प्रॉपर्टी कार्ड सदरी तसेच आवश्यक त्या सर्व सरकारी दप्तरी लिहून घेणार यांचे नाव लावून घेण्यास लिहून देणार यांची कोणतीही हरकत नाही व त्यास लिहून घेणार यांना आवश्यक त्या सर्व सहया, जाबजबाब, संमती लागल्यास लिहून देणार हे विनामोबदला देतील तसेच सदर मिळकतीबाबत कोणतेही बॉण्डस, अंडरटेकींग, ॲफिडेव्हिट, मान्यता पत्र, पुरवणी दस्ताची गरज भासल्यास ती लिहून देणार हे विनामोबदला देतील.

(आय) सदर खरेदीखतात विषय असलेल्या मिळकतीला नागरी जमिन कमाल धारणा कायदा, १९७६ च्या तरतुदी लागू होत नाही तसेच सदर खरेदीखतास व सदर मिळकतीच्या हस्तांतरणास कोणत्याही कायदयाची बाधा येत नाही.

(जे)सदर मिळकतीबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती आज रोजी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सुपुर्त केल्या आहेत व त्याची वेगळी पावती लिहून घेणार यांनी वेगळी दिली आहे. सदर सर्व्हे नं. ४६/२९ बाबतची सर्व अस्सल कागदपत्रे सदर संपुर्ण मिळकत विक्री होईपर्यंत लिहून देणार यांच्या ताब्यात राहतील व त्यानंतर सदर संपुर्ण मिळकतीपैकी सर्वात मोठे क्षेत्र खरेदी करणा-याकडे लिहून देणार अशी सर्व अस्सल कागदपत्रे सोपवतील.

५. सदर दस्त मिळकतीच्या करांविषयी -

सदर मिळकतीचे आजपावेतो सर्व सरकारी, निमसरकारी, महसुली कर वगैरे लिहून देणार यांनी भरलेले असून प्रस्तुत नोंदणीकृत खरेदीखतानंतर सदर दस्त मिळकतीचे सर्व सरकारी, निमसरकारी, महसुली कर वगैरे लिहून घेणार यांनी मालकी हक्काने भरावयाचे आहेत. मात्र खरेदीखतापुर्वीची मागील कोणत्याही प्रकारची बाकी निघाल्यास ती भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील. त्याची कोणतीही तोषीस लिहून घेणार यांना लागु दयावयाची नाही.

६. सदर दस्त मिळकतीच्या भोगवटयाची कागदपत्रे -

सदर दस्त मिळकतीचे ग्रामपंचायत उतारे, खरेदीखताची प्रत, इत्यादी कागदपत्रे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांच्या ताब्यात भोगवटयास दिलेली आहेत. भोगवटयासंदर्भात

Scanned with OKEN Scanner

आणखी कागदपत्रांची गरज भासल्यास व ती लिहून देणार यांचेकडे असल्यास त्या सर्व कागदपत्रांची प्रत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना विनामोबदला व विनाविलंब दयावयाची आहेत.

७. सदर दस्त मिळकतीच्या चतु:सिमाबाबत -

संबंधित सर्व सरकारी दफ्तरी आणि प्रत्यक्ष जागेवर ज्याप्रकारे सिमा असतील त्यानुसार सदर दस्त मिळकतीच्या चतु:सिमा अंतिम धरण्यात याव्यात. सदर दस्त मिळकतीच्या चतु:सिमाबाबत कोणत्याही प्रकारची चुक दिसून आल्यास त्याचा प्रस्तुत दस्तावर कोणताही परिणाम होणार नाही. व आवश्यकता भासल्यास लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना तसा चुकदुरुस्ती दस्त लिहून देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.

८. इतर अटी व शर्ती -

(अे) प्रस्तुत खरेदीखतापासून वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये लिहून देणार यांचा कोणताही ताबा, हक्क, अधिकार व हितसंबंध, वगैरे राहिलेला नाही. सदर मिळकतीचे प्रस्तुत खरेदीखत कोणत्याही कारणस्तव रदद्बातल करण्याचा किंवा रदद्बातल ठरवून मागण्याचा लिहून देणार यांना हक्क व अधिकार राहिलेला नाही वा राहणार नाही.

(बी) सदर मिळकतीचा प्रस्तुत व्यवहार हा लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये कायमस्वरुपी असून गहाणवटीचा अथवा परत बोलीचा नाही. तसा कोणताही लेखी अथवा तोंडी करार उभयतांमध्ये झालेला नाही.

(सी) वालीवारसांवर बंधनकारक -

वरील सर्व अटी व शर्ती लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर तसेच त्यांचे वालीवारस, एक्झिक्युटर्स, असायनीज, नॉमिनीज, यांचेवर कायमस्वरुपी बंधनकारक आहे व राहील. त्याचप्रमाणे लिहून घेणार व लिहून देणार यांचे वालिवारस प्रस्तुत खरेदीखतातील अटी व शर्तीचे पालन करतील.

(डी) प्रस्तुत खरेदीखताचा खर्च -

प्रस्तुत नोंदणीकृत खरेदीखतासाठी जो काही मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी, टायपिंग, झेरॉक्स इ. खर्च करावा लागणार आहे तो सर्व खर्च लिहून घेणार यांनी केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

(इ) **लोकेशन -**

सदर मिळकत ही बाजारमुल्य दर तक्ते सन २०२२ नुसार ती मौजे न-हे, विभाग क्र. ७६ येथे आहे. सदर विभागात खुल्या जमिनीचा दर रु. ७,४१०/- प्रति चौ. मी. आहे.

(एफ) **मुद्रांक शुल्क व नोदणी फी -**

लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये सदर मिळकतीचा आपापसात ठरलेला मोबदला **रक्कम रु. १,२२,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लाख चार हजार फक्त)** इतका आहे. सदर मिळकतीचे बाजारभावाप्रमाणे मूल्य रु. ..../- इतके होत आहे. सदर मिळकतीची मोबदला रक्कम बाजारभाव रक्कमेपेक्षा जास्त असल्याने मुद्रांक शुल्क रक्कम रु. ..../- व सोबत नोंदणी फी रक्कम रु. ३०,०००/- भरलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

येणेप्रमाणे प्रस्तुत खरेदीखतातील संपुर्ण मजकुर वाचून, समजून व उमजून घेवून लिहून देणार व लिहून घेणार यांनी खालील साक्षीदारांसमक्ष राजीखुशीने व अक्कल हुशारीने तसेच कोणत्याही प्रकारचे दबाव, दडपण व अमिषविना त्याचप्रमाणे कसल्याही प्रकारचे नशापान न करता सहया/ अंगठे दिले असून तो लिहून देणार व लिहून घेणार यांचेवर तसेच त्यांचे वालीवारस इत्यादीवरही कायमस्वरुपी बंधनकारक आहे व राहील.

अंगठा	सही	फोटो	नाव
			कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशन तर्फे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर उद्धवराव जाधवर लिहून घेणार
			१) श्री. अतुल श्रीनिवास खरे लिहून देणार
			२) श्री. यशोधन श्रीनिवास खरे लिहून देणार

साक्षीदार :-

१. सही :: ____________________ २. सही :: ____________________

नाव :: .... नाव :: ....

पत्ता :: .... पत्ता :: ....

Scanned with OKEN Scanner